**प्रेस नोट**

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगाव

दि.२१/०३/२०२५

**आरोपी क्र.१)प्रविण दिपक चौधरी ,वय ३९ वर्ष ,सहाय्यक कार्यक्रम अधिकारी ,पंचायत समिती,धरणगाव रा.म्हसवे ,ता.पारोळा जि.जळगाव (कंत्राटी सेवक ) आरोपी क्र.२) उमेश किशोर पाटील, वय ३६ वर्ष ,तांत्रीक सहाय्यक,पंचायत समिती,धरणगाव रा.दोंदवाडे,ता.चोपडा ,जि.जळगाव (कंत्राटी सेवक ) यांनी १५००/- रु. लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत**

------------------------------------------OOO------------------------------------------

यातील तक्रारदार यांचे आनोरा शिवारात गट क्र.१९२/१ येथे शेती आहे. सदर ठिकाणी त्यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गोठा शेड तयार करावयाचे होते. सदर कामाकरिता दि.१६.०८.२०२४ रोजी धानोरा ग्रामपंचायतीकडुन गोठा शेड तयार करण्यासाठीचा ठराव मंजुर करुन तक्रारदार यांचेसह इतर १० शेतकऱ्यांचे गोठा शेड तयार करण्याची प्रकरणे पंचायत समिती धरणगाव येथे पाठवले होते. परंतु गोठा शेड तयार करण्याची मंजुरी प्राप्त न झाल्याने त्याची चौकशी करण्यासाठी तक्रारदार यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी पंचायत समिती कार्यालय धरणगाव येथे जावुन आरोपी क्र.१ यांची भेट घेतली होती. तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना गोठा शेड मंजुरीचे आदेश तयार झाले असल्याचे सांगुन, सदर आदेशाची प्रत देण्याचे मोबदल्यात २ हजार रुपये लाचेची मागणी केले बाबत तक्रारदार यांनी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर लाचमागणी तक्रारीची दि.२१.०३.२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता तक्रारदार यांना त्यांचे शेतात गोठा शेड बांधण्याचा कार्यारंभ आदेशाची प्रत देण्याचे मोबदल्यात आरोपी क्र.१ यांनी प्रथम २,०००/–रुपये लाचेची मागणी करुन, यशस्वी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन तडजोडीअंती १,५००/–रुपये लाच रक्कम स्वतः स्विकारली. तसेच आरोपी क्र.१ याने आरोपी क्र.२ यास फोन करुन तक्रारदार यांचे समक्ष बोलावुन घेतले. व तक्रारदारास आरोपी क्र.२ हा गोठा शेड बांधकाम करण्याचे ठिकाणी जागेची आखणी करुन सदर जागेचे जी.पी.एस.द्वारे फोटो काढुन देण्यासाठी आनोरा गावी येणार आहे. त्यासाठी त्याला पेट्रोल पाण्याचे पैसे देण्यास सांगीतले. त्यास आरोपी क्र.२ याने कोणताही विरोध न दर्शवता तक्रारदार यांना पेट्रोल पाण्याचे नावाखाली लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहीत केले म्हणुन गुन्हा वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.भारत तांगडे ,पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री.माधव रेड्डी ,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश जी.ठाकूर ,पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.जळगाव करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहीजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दुरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लँडलाईन ते लँडलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्रि नं. १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | ०२५७ - २२३५४७७ | १०६४ |
| २ | नाशिक | ०२५३ - २५७५६२८ , २५७८२३० | १०६४ |
| ३ | अहमदनगर | ०२४१ - २४२३६७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२ - २३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४ - २३०००९ | १०६४ |

**योगेश जी. ठाकूर**
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव